# नागाव केंद्राची शिक्षण परिषद माजगाव शाळेत उत्साहात संपन्न; शैक्षणिक व प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर करडे**

**मुरबाड :** नागाव केंद्राची ऑगस्ट महिन्यातील शिक्षण परिषद शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद माजगाव शाळेत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या शिक्षण परिषदेत शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाजातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस शाळेतील विद्यार्थिनींनी उपस्थित गुरूजन व मान्यवरांचे औक्षण करून स्वागत केले. त्यानंतर प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी केंद्रसमन्वयक महेश गावडे यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. माजगाव जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती वनिता मोठे व दीपक भावार्थ यांनी माजगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. अनिता पष्टे तसेच उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प व पेन देऊन स्वागत केले. शिक्षण परिषदेच्या प्रथम तासिकेत रंजित पवार यांनी माजी विद्यार्थी संघ व समितीच्या कार्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच समितीची माहिती सरल पोर्टलवर कशा पद्धतीने भरावी, याबाबत शिक्षकांना महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. त्यानंतर नियोजनानुसार विविध तासिका घेण्यात आल्या. केंद्रसमन्वयक महेश गावडे यांनी केंद्रातील प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. तसेच 'अनुशीलन वेध गुणवत्तेचा' शिष्यवृत्ती परीक्षेच्या अनुषंगाने सर्व शिक्षकांनी मनापासून व जोमाने





काम करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

**शालेय पोषण आहाराच्या FSSAI परवान्याबाबत महत्त्वपूर्ण चर्चा :** शिक्षण परिषदेत शालेय पोषण आहाराच्या FSSAI नोंदणी अथवा परवान्याच्या विषयावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार अन्न मिळणे अत्यंत आवश्यक असल्याने पोषण आहार व्यवस्थेतील स्वच्छता, अन्नसाठवणूक, पाण्याची गुणवत्ता, स्वयंपाकाची स्वच्छता आणि अन्न वितरण याबाबत आवश्यक उपाययोजनांची गरज व्यक्त करण्यात आली. मुख्याध्यापकांच्या नावावर खाद्य व्यवसायाशी संबंधित नोंदणी अथवा परवाना घेतला जात असल्यास, त्यांची कायदेशीर व व्यावहारिक जबाबदारी नेमकी कोणत्या मर्यादेपर्यंत असेल, याबाबत स्पष्टता असणे आवश्यक असल्याचे मत शिक्षकवर्गातून व्यक्त करण्यात आले. शासनाकडून शाळांना अन्नधान्य व इतर साहित्य पुरविले जाते. त्यामुळे अन्नधान्याचा दर्जा, साठवणूक, पाण्याची गुणवत्ता, स्वयंपाकाची स्वच्छता आणि अन्न वितरणाच्या प्रक्रियेत मुख्याध्यापकांवर अतिरिक्त कायदेशीर जबाबदारी येऊ नये, यासाठी शासनाने स्पष्ट मार्गदर्शक सूचना व नियमावली उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. अन्नातून विषबाधा झाल्यास किंवा अन्नाचा दर्जा निकृष्ट आढळल्यास संबंधित जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाईची शक्यता असते. त्यामुळे मुख्याध्यापकांची नेमकी भूमिका, जबाबदारी आणि अधिकार शासनाने लेखी स्वरूपात स्पष्ट करणे गरजेचे असल्याचे मत मांडण्यात आले. शालेय पोषण आहार योजना ही शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येणारी योजना असल्याने मुख्याध्यापकांना अनावश्यक कायदेशीर जोखमीपासून संरक्षण मिळावे, तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांचे पालन करण्यासाठी आवश्यक सुविधा, निधी, प्रशिक्षण, पाण्याची तपासणी, स्वच्छता व्यवस्था आणि अन्नसाठवणुकीच्या सुविधा शासनाने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही यावेळी व्यक्त करण्यात आली.

**मध्यान्ह भोजन व गणवेशाच्या विषयावरही चर्चा :** मध्यान्ह भोजन तसेच विद्यार्थ्यांच्या गणवेशासंदर्भातील विविध मुद्द्यांवर बाळकृष्ण पवार तसेच स्वाभिमान शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष . वसंत घावट यांनी केंद्रसमन्वयक महेश गावडे यांच्याशी चर्चा केली. व द्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांना मिळणाऱ्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर यावेळी विचारविनिमय करण्यात आला. या शिक्षण परिषदेस माजगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. अनिता पष्टे, पत्रकार संदीप पष्टे, बाळकृष्ण पवार, घुडे, गवाले, घावट तसेच केंद्रातील शिक्षकवृंद उपस्थित होते. शिक्षण परिषदेमुळे शैक्षणिक, प्रशासकीय तसेच विद्यार्थ्यांशी संबंधित विविध विषयांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली. आगामी शैक्षणिक कामकाजासाठी शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन मिळाल्याने परिषद उत्साहात व यशस्वीपणे संपन्न झाली.

# सद्भावनेतून मानवतेकडे जाण्याचा विद्यार्थ्यांना संदेश

## जागतिक मानवतावादी दिवसानिमित्त व्याख्यान





आधुनिक केसरी न्यूज

**वरोडा :** जात, धर्म, भाषा आणि प्रांताच्या सीमा ओलांडून गरजू माणसाच्या मदतीला धावून जाणे म्हणजेच खरी मानवता आणि सद्भावना होय असा संदेश आनंदनिकेतन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात आला. आनंदनिकेतन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक मानवतावादी दिवस व सद्भावना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉक्टर पल्लवी ताजने यांनी दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मृणाल काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. भारतीय संस्कृतीतील सद्भावनेची उदाहरणे देताना त्यांनी ऋग्वेदातील "संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्" हा मंत्र उद्धृत केला. "एकत्र चला, एकत्र बोला आणि तुमची मने एकत्र असू द्या" हा या मंत्राचा व्यापक अर्थ विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. त्याचप्रमाणे उपनिषदातील "ईशावास्यमिदं सर्वम्" आणि "वसुधैव कुटुम्बकम्" या संकल्पनांतून संपूर्ण विश्व एक कुटुंब असल्याचा संदेश भारतीय विचारपरंपरेने दिला आहे, असे त्यांनी सांगितले."सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः " या प्रार्थनेतून प्रत्येकाच्या सुखाची आणि कल्याणाची अपेक्षा व्यक्त होते. त्यामुळे भारतीय संस्कृतीतील मानवतावाद हा केवळ विचार न राहता जीवनव्यवहाराचा भाग बनला पाहिजे असेही डॉ. ताजने यांनी नमूद केले. आधुनिक भारतातील मानवतावादी कार्याचा संदर्भ देताना साने गुरुजी, बाबा आमटे आणि तुकडोजी महाराज यांच्या कार्याचा उल्लेख करण्यात आला. साने गुरुजींच्या श्यामची आईमधून मिळणारे प्रेम, करुणा आणि संस्कार; बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी उभे केलेले आनंदवन, कुष्ठरोग निवारणाच्या कार्यातील इतरांचे कार्य आणि बाबा आमटे यांच्या कार्यातील फरक त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितला आणि तुकडोजी महाराजांनी दिलेला ग्रामविकास व समाजसेवेचा संदेश ही सद्भावनेची प्रेरणादायी उदाहरणे असल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य "NOT ME BUT YOU" हेच मुळात सद्भावना आणि मानवतावादाचे ब्रीद असून तेच विद्यार्थ्यांच्या सामाजिक जीवनाचे मार्गदर्शक तत्त्व असावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. धनश्री पंचभाई, प्रा. सुरेश राठोड आणि प्रा. नीरज आत्राम हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मानवता, सहकार्य, बंधुभाव आणि सेवाभाव आपल्या दैनंदिन जीवनात रुजविण्याचा संकल्प करावा, या संदेशाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मौजे कर्णा येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** कंधार विधानसभा मतदारसंघातील मौजे कर्णा येथे आयोजित साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 106 व्या जयंती महोत्सव कार्यक्रमास उपस्थित राहून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले व ध्वजारोहण केले. याप्रसंगी उपस्थित सर्व समाज बांधवांना जयंतीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देऊन संवाद साधला. केवळ भाषण नव्हे तर कृतीतून विकास हेच माझे ध्येय आहे.



**कर्णा गावातील समाज बांधवांसाठी केलेली विकासकामे आणि लोकार्पण :** अण्णाभाऊ साठे पुतळा सुशोभीकरण – 3 लाख रु. (काम पूर्ण)

समाज मंदिर दुरुस्ती – 5 लाख रु. (काम पूर्ण) दोन्ही मिळून 8 लाख रुपयांच्या कामांचे आज औपचारिक लोकार्पण केले. मातंग समाज सभा मंडप – 10 लाख रु. मंजूर बुद्ध विहार सभा मंडप व सुशोभीकरण – यापूर्वी 5 लाख रु. व आताचे 10 लाख रु. असे एकूण 25 लाख रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन आज कर्णा येथे संपन्न झाले. यापुढील राहिलेले सभामंडप व सुशोभीकरणाकरिता राज्य शासनाकडे पाठपुरावा करून अतिरिक्त 15 लाख रुपये मंजूर केले आहेत. पुढील काळात गावातील शाळा दुरुस्ती, सभा मंडप, गावांतर्गत सीसी रोड व इतर प्रलंबित कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. तसेच माझ्या कार्यकाळात कर्णा-होकर्णा-मोटरगा हा रस्ता पूर्ण झाला असून, कर्णा पुलापासून ते एकलारा फाट्यापर्यंतच्या रस्त्यासाठी तब्बल 19.50 कोटी रुपये मंजूर केले आहेत. कर्णा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू देणार नाही, असा शब्द मी आज दिला. मला आमंत्रित करून माझा सत्कार केल्याबद्दल जयंती मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, समस्त गावकरी व विशेषतः मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या माता-भगिनींचे मनःपूर्वक आभार! यावेळी माझ्यासोबत भाजपा विधानसभा प्रमुख खुशालराव पाटील उमरदरीकर, माजी जि.प. सदस्य संतोषराव बोनेलेवाड, डॉ. रणजित काळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, कार्यकर्ते, ग्रामस्थ, तरुण मित्र व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नारायणराव नागरे महाविद्यालयात जलसंवर्धन सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



आधुनिक केसरी न्यूज

**बाळासाहेब भोसले**

**सिदखेडराजा :** तालुक्यातील दुसबीड दिनांक 24 नारायणराव नागरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जलसंवर्धन सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. सुधाकररावजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त जलसंवर्धन सप्ताहाचे 1 ऑगस्ट ते 24 ऑगस्ट, 2026आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जलसंवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, पाणी बचत आणि जलस्रोतांचे संरक्षण याबाबत जनजागृती करण्यात आली. भविष्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रत्येकाने जलसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय नागरे होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. गणेश घुगे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भगवान शिंदे यांनी केले. त्यांनी जलसंवर्धनाचे महत्त्व विशद करून पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी शुभांगी देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शंकर मेहर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक शेख युनुस प्रा प्रियांका खंदारे श्री अनिल गायकवाड श्री अनिल रानमळे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या या उपक्रमातून 'पाणी अडवा, पाणी जिरवा आणि पाणी वाचवा' हा संदेश विद्यार्थ्यांमार्फत समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# क्षीरसागर पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटला शासनाची मान्यता

## एडीएमएलटी अभ्यासक्रमामुळे भिगवण परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी

आधुनिक केसरी न्यूज

**निलेश मोरे**

**भिगवण :** शिक्षण प्रसारक मंडळ संचलित क्षीरसागर पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटला शासनमान्यताप्राप्त तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्न ॲडव्हान्स डिप्लोमा इन मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (ADMLT) या रोजगाराभिमुख व कौशल्याधारित अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली आहे. त्यामुळे भिगवण व परिसरातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण स्थानिक पातळीवरच घेता येणार असून, वैद्यकीय क्षेत्रातील रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष अजित क्षीरसागर यांनी दिली. या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना वैद्यकीय प्रयोगशाळेतील विविध तपासण्या, नमुना संकलन व हाताळणी, प्रयोगशाळेतील आधुनिक उपकरणांचा वापर, विविध चाचण्यांचे तांत्रिक ज्ञान तसेच प्रयोगशाळेसाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि व्यावहारिक कौशल्य विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. वैद्यकीय क्षेत्रात प्रशिक्षित प्रयोगशाळा तंत्रज्ञांची वाढती गरज लक्षात घेता हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हॉस्पिटल, पॅथॉलॉजी लॅबोरेटरी, डायग्नोस्टिक सेंटर तसेच आरोग्य क्षेत्रातील विविध संस्थांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. यासोबतच कौशल्याच्या आधारे स्वयंरोजगाराच्या संधीही निर्माण होण्यास मदत होणार आहे. भिगवण परिसरातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण व कौशल्य प्रशिक्षणासाठी बाहेरील शहरांकडे जावे लागू नये, तसेच स्थानिक पातळीवरच दर्जेदार व रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असल्याचे प्रा. तुषार क्षीरसागर यांनी सांगितले. वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी क्षीरसागर पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटमध्ये सुरू होणारा ADMLT अभ्यासक्रम ही एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक व व्यावसायिक संधी ठरणार आहे.

# माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांना जीवनसाधना पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६८ वा वर्धापन दिन रविवारी (दि.२३) विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळयास कुलगुरु डॉ.संजीव सोनवणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांना जीवनसाधना पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन रविवारी (दि.२३) करण्यात आले. या सोहळयासाठी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगरु डॉ. संजीव सोनवणे यांना प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या निमित्त ध्वजारोहण, जीवन साधना पुरस्कार वितरण, गुणवंताना पारितोषिक वितरण आदी कार्यक्रम झाले. मुख्य सोहळा नाट्यगृहात झाला. कुलगुरू डॉ विजय फुलारी यांनी अध्यस्थान भूषविले. यावेळी ज्येष्ठ सनदी अधिकारी भास्कर मुंढे, प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.गजानन सानप, प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी विभागीय आयुक्त भास्कर शंकरराव मुंढे यांना जीवनसाधना पुरस्कार, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यापीठाच्या ६८ वर्षांच्या प्रगतीचा आढावा प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते यांनी प्रास्ताविकातून घेतला. डॉ.वैशाली बोदले यांनी सूत्रसंचालन तर डॉ.संजय शिंदे यांनी आभार मानले. परीक्षा मंडळ संचालक डॉ बी एन डोळे यांनी पारितोषिकांचे वाचन केले. यावेळी विविध पारितोषिक, पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी मुख्य प्रशासकीय



ईमारतीसमोरील हिरवळीवर मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते विद्यापीठाचा ध्वज फडकाविण्यात आला.

**विविध पुरस्कार, पारितोषिकांचे वितरण :** मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या संकल्पनेतून उत्कृष्ट कर्मचारी, शिक्षक प्रत्येकी दोन व एक प्राचार्य असे एकुण पाच पुरस्कार प्रदान करण्यात आले. यंदाच्या पुरस्कारार्थीमध्ये उत्कृष्ट प्राचार्य डॉ.शिवदास शिरसाठ - यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, उत्कृष्ट शिक्षक डॉ.रामकृष्ण हरिदास कदम - श्रीकृष्ण महाविद्यालय गुंजोटी (ता.उमरगा, जि.धाराशिव), महाविद्यालयीन कर्मचारी डॉ.दर्शना गांधी - जोशी - विद्यापीठ शिक्षक - डॉ.मच्छिंद्र लांडे व कर्मचारी डॉ.अनिता पाटील यांचा गौरव करण्यात आला. वर्धापनदिनानिमित्त दोन महाविद्यालयांना दिवंगत शिक्षक आमदार वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कारासाठी शिवाजी महाविद्यालय -कन्नड व व्हीएसएस महाविद्यालय - जालना या दोन महाविद्यालयांची निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ.विजय भोसले व प्राचार्य डॉ.प्रसाद मदन यांना पुरस्कार प्रदान करण्यात आलं . यावेळी मार्च एप्रिल २०२६ परीक्षेतील १७ गुणवंतांना रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. संचालक डॉ बी एन डोळे यांनी पारितोषिकांचे वाचन केले. विद्यार्थी विकास मंडळातर्फे राजर्षी शाहू महाराज वक्तृत्व स्पर्धा तसेच अँटी रॅगिंग सप्ताह निमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरणही करण्यात आले. या सर्वांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

**मान्यवरांचे भाषणे :** ज्ञानभूमीने घडविले अनेकांचे जीवन : डॉ.सोनवणे प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या विद्यापीठाच्या ज्ञानभूमीने खेडयापाडयातून आलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे समग्र जीवन घडविले. माझ्या सारख्या ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्याला कुलगुरुपदी पोहाचेविल्या बद्दल विद्यापीठाविषयीची कृतज्ञता कुलगुरु डॉ.संजीव सोनवणे यांनी व्यक्त केली. ज्ञानाचे रुपांतर संपत्तीत करण्यात शिक्षण क्षेत्राचे मोठे योगदान असून देशाला महासत्ता करण्यासाठी सर्वांनी मिळून नेटाने प्रयत्न करावेत, असे अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**कर्तव्यनिष्ठेने काम करणारा प्रत्येकजण श्रेष्ठ : भास्कर मुंढे** डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, अधिकारी असो की राजकारणी कोणतेही क्षेत्र श्रेष्ठ-कनिष्ठ असे काही नसते. तर कर्तव्यनिष्ठ व प्रामाणिकपणे काम करुन आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटविणारी प्रत्येक व्यक्ती श्रेष्ठच असते, असे प्रतिपादन माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंढे यांनी व्यक्त केले. विद्यापीठाचा विद्यार्थी ते प्रभारी कुलगरु आणि ज्ञानसाधना पुरस्कारार्थी या ५० वर्षाच्या वाटचालीचा आढावा त्यांनी फ्लॅशबॅक पध्दतीने घेतला. अंबाजोगाईतून त्यावेळच्या औरंगाबादला (आजचे छत्रपती संभाजीनगर) येताना अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या गाडीतून प्रवास झाल्याची भावना होती. तर खेडयापाड्यातील सर्वसामान्य माणसांच्या सहकार्याने प्रशासनात खूप काही करता आले, असेही ते म्हणाले. औषधी गोळी चघळायची नसते : कुलगुरु डॉ.विजय फुलारी कोणताही आजार नीट करायचा असेल तर गोळी खावीच लागते. मात्र चघळत बसले कि गोळी कडूच लागते. आपणही ही व्यवस्था नीट करण्यासाठी वेळप्रसंगी योग्य गोळी दिली. आता काही प्रमाणात सुधारणा होत असल्याचे समाधान आहे, असे कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षीय समारोपात म्हणाले. गेल्या ६८ वर्षात विद्यापीठाने प्रगतीची अनेक शिखरे गाठली असे सांगितले. 'नॅक' 'ए प्लस' मानांकन प्राप्त असलेले आणि 'फर्स्ट जनरेशन ग्रॅज्युएट्स' घडविणारे आपले विद्यापीठ आहे. अत्यंत कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे, असेही कुलगुरु म्हणाले.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतले केसरेकर दाम्पत्याच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व

## तात्काळ एक लाख रुपये बँक खात्यात जमा करणार



आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** कुपवाड येथील घटनेत मृत्यू झालेल्या केसरेकर दाम्पत्याच्या दोन्ही मुलांचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यांच्या घरी प्रत्यक्ष भेट घेऊन सांत्वन केले व त्यांना धीर दिला. दुःखाच्या या प्रसंगी शासन आणि प्रशासन मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, मुलांना कोणत्याही प्रकारची अडचण भासू नये यासाठी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल, असे सांगून या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वतः घेणार असल्याचे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज सांगितले. यावेळी खासदार विशाल पाटील, आमदार डॉ. सुरेश खाडे, आमदार सुधीर गाडगीळ, महापौर धीरज सुर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, पालकमंत्री महोदयांचे विशेष कार्य अधिकारी बाळासाहेब यादव, महानगरपालिका सभागृह नेते संदीप आवटी, उपमहापौर गजानन मगदूम, नगरसेवक विष्णू माने आदि उपस्थित होते. पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, केसरेकर दाम्पत्याच्या दोन्ही मुलांना आष्टा येथील अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुलात ठेऊन तेथील वसतिगृहाचा खर्चही करण्यात येईल. मुलांच्या शैक्षणिक व अन्य खर्चासाठी त्यांच्या बँक खात्यात तात्काळ एक लाख रुपये जमा करत असल्याचे सांगून यापुढेही आवश्यकतेप्रमाणे पैसे मुलांच्या खात्यात जमा करण्यात येतील, असे सांगितले. त्याचबरोबर दोषींवर १५ दिवसांच्या आत चार्जशीट दाखल करण्याच्या सूचना त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्याशी चर्चा करून ही केस नियमितपणे चालवून लवकरात लवकर दोषीला शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी महापालिका पदाधिकाऱ्यांनी सामुहिकरित्या केसरेकर दाम्पत्याच्या आर्थिक मदतीची जबाबदारी घेत असल्याचे सांगितले.

# स्वस्त दुकानातून निकृष्ट दर्जाचे धान्य वितरण, नागरिकांचा संताप

## तहसीलदार व अन्नपुरवठा अधिकाऱ्यांकडे तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** तालुक्यातील हरडफ येथील स्वस्त दुकानाधून मागील काही महिन्यांपासून अत्यंत निकृष्ट दर्जाचे, खाण्यायोग्य नसलेले आणि बारीक माती व बुरशीयुक्त धान्य दिले जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी त्रस्त ग्रामस्थांनी आणि शेतकऱ्यांनी आक्रमक होत थेट तहसीलदार तथा तालुका अन्नपुरवठा अधिकारी, हदगाव यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत हरड़फ येथील नागरIकांना नियमित अन्नधान्य मिळणे अपेक्षित आहे. मात्र, संबंधित रेशन दुकानातून गेल्या सहा महिन्यांपासून वाटप केले जाणारे गहू, तांदूळ व इतर माल अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून त्यात बारीक माती व बुरशी मिसळलेली आहे. हे धान्य खाण्यायोग्य नसल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून अनेक जण आजारी पडत आहेत. हातात पोट असणारा गोरगरीब व शेतकरी वर्ग पूर्णपणे रेशनवर



अवलंबून असतो. अशा गरजू लोकांच्या आरोग्याशी खेळत निकृष्ट माल वाटप करून स्थानिक पातळीवर वितरणात मोठा अनियमितपणा व हलगर्जीपणा केला जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी तात्काळ दखल घेऊन संबंधित रेशन दुकानाची व पुरवठा केलेल्या मालाची अचानक पाहणी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष कृष्णा पाटील हरडफकर यांनी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी प्रहार जनशक्तीचे शाखाध्यक्ष; अनिल पाटील सूर्यवंशी, गजानन गणेशराव सूर्यवंशी, बालाजी बापूराव पवार, शिवाजी संभाजी गिरामकर, सदीप साहेबराव सूर्यवंशी, आशिष वाठोरे, स्वाभिमानी संघटनेचे शहराध्यक्ष; आकाश, गोदले, विठ्ठल दत्ता पवार, मारोती कोंडबाराव, कदम, काशीनाथ उत्तम वारकड, बेलाजी विश्वनाथ, शिवणतवाड, सुनील नथू पांचाळ, खडु आनंदा राव जाधव यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जत नगरपरिषदेच्या इमारतीसाठी शासकीय जमीन

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** जिल्ह्यातील जत नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी २५८५ चौ.मी. शासकीय जमीन विनामूल्य देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. मौजे जत, ता. जत, जि. सांगली येथील स. नं. ५१०/२ ब/१ मधील एकूण ६६०० चौ.मी. क्षेत्रापैकी २५८५ चौ.मी. शासकीय जमीन 'प्रशासकीय इमारतीचे बांधकाम' या



प्रयोजनासाठी जत नगरपरिषदेला देण्यात येणार आहे. या जमिनीचा कब्जेहक्काने, भोगाधिकार मूल्यरहित व महसूलमुक्त पद्धतीने तसेच भोगवटादार वर्ग-दोन या धारणाधिकाराने नगरविकास विभागामार्फत जत नगरपरिषद, जत यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या विषयी बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, "जत नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी आवश्यक असलेली शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करण्यासोबतच नागरिकांना अधिक चांगल्या आणि सुलभ नागरी सेवा मिळाव्यात, यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याला आमचे सरकार प्राधान्य देत आहे. जत नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीसाठी जमीन उपलब्ध झाल्याने नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजाला निश्चितच बळ मिळेल आणि जत शहराच्या विकासाला गती मिळेल."

# तरुण संशोधक डॉ. अजिंक्य कोत्तावार यांची वरिष्ठ वैज्ञानिक म्हणून नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**वसमत :** हळद संशोधनाच्या क्षेत्रात गेल्या दशकभरापासून सातत्याने कार्यरत असलेले संशोधक डॉ. अजिंक्य कोत्तावार यांची बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्र, वसमत येथे सल्लागार व वरिष्ठ वैज्ञानिक (CONSULTANT & SENIOR SCIENTIST) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्राचे अध्यक्ष नामदार हेमंत पाटील यांनी ही नियुक्ती केली आहे. डॉ. अजिंक्य कोतावार यांच्या नावावर आतापर्यंत ४८ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पेटंट्स असून, त्यापैकी तब्बल २५ पेटंट्स केवळ हळद या एकाच विषयातील संशोधनाशी संबंधित आहेत. गेल्या सुमारे १० वर्षांपासून त्यांनी हळद, तिचे जैव-सक्रिय घटक आणि त्यांचे विविध संभाव्य उपयोग यावर सखोल संशोधन केले आहे. याच दीर्घकालीन संशोधन अनुभवाच्या पार्श्वभूमीवर त्यांची या महत्त्वपूर्ण संशोधन केंद्रात नियुक्ती करण्यात आली आहे. हळद संशोधनातून शेतकरी आणि देशाला फायदा होणार आहे : भारत हा जगातील प्रमुख हळद उत्पादक देश असून, हळद ही केवळ मसाल्याचे पीक नसून तिच्यामध्ये



असलेल्या विविध जैव-सक्रिय घटकांमुळे तिच्या औषधी, आरोग्यविषयक आणि औद्योगिक उपयोगांच्या मोठ्या शक्यता आहेत. या शक्यतांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून नवीन संशोधन, तंत्रज्ञान आणि मूल्यवर्धित उत्पादने व ऊप उत्पादने विकसित करणे, तसेच या संशोधनाचा प्रत्यक्ष फायदा हळद उत्पादक शेतकरी, समाज आणि देशाला मिळवून देणे हा बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे. हळदीपासून केवळ कच्च्या मालाच्या स्वरूपात उत्पन्न मिळण्याऐवजी तिच्या विविध घटकांवर संशोधन करून उच्च-मूल्याची उत्पादने, नवीन प्रक्रिया तंत्रज्ञान आणि आरोग्यविषयक उपयोग विकसित झाल्यास हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठ्या मूल्यवर्धनाच्या संधी निर्माण होऊ शकतात. डॉ. कोत्तावार यांच्या हळद संशोधनातील एक महत्त्वाचा भाग कर्करोग विषयक संशोधनाशी संबंधित आहे. हळदीतील जैव-सक्रिय घटक कर्क्यूमिन, सायक्लोकर्क्यूमिन तसेच विविध नॅनोपार्टिकल-आधारित संशोधन या क्षेत्रांमध्ये त्यांनी कार्य केले आहे. त्यांच्या काही पेटंट्सचा संबंध कर्करोग विरोधी औषधांच्या संशोधनाशीही आहे. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्र, वसमत येथे डॉ. अजिंक्य कोतावार यांची झालेली ही नियुक्ती हळद संशोधनाच्या क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण मानली जात असून, भारताच्या हळद संशोधनाला जागतिक पातळीवर अधिक सक्षम स्थान मिळवून देण्यासाठी तसेच स्थानिक शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांच्या अर्थकारणाला चालना देणे यासाठी उपयुक्त ठरणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून भविष्यात हळद शेती व प्रक्रिया याबाबत महत्त्वपूर्ण संशोधनकार्य उभे राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भक्ति सिध्दांत नसुन जीवन रस आहे : प्रा. अण्णाराव मुंढे

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** भक्ती म्हणजे ऊर्ध्वगामी प्रेम. एक व्यक्ती आणि समष्टी यांच्यातील प्रेम, सर्वस्वासह भगवंताच्या प्रेम सागारात बुडणे, सर्वांना आलिंगन देण्याची कला. स्वतः ला आलिंगन देण्यासाठी देण्यात येणारे निमंत्रण आहे. भक्ती ही शास्त्र नाही यात्रा,उत्सव आहे. भक्ती शास्त्रात लिखित नाही परंतु भक्ताच्या हृदयात कोरलेली असते. म्हनून भक्ती शास्त्र, शब्द किंवा सिद्धांत नाही तर आपल्या जीवनातील सत्य रस आहे. मानवी जीवनातील जीवंत सत्य आहे. भगवंतासाठी सर्वात उच्च शुद्ध प्रेम म्हणजे भक्ती आहे. भक्ती म्हणजे मन, वाणी, विचार, कृती यामधील लगाम, भागीदारी, स्नेह, विश्वास, प्रेम, समर्पण, पूजा आणि पवित्रता आहे .निराकारासी एकाकार करणे, वीराटाचे दर्शन घेण्याची कला, जीवन रुपांतराची कला. स्वतःचे स्वरूप बदलण्यासाठी केलेले कर्म आहे .भगवंतिविषयी परमप्रेम रूप,आत्मस्वरूप ज्याच्यामुळे मनुष्य सिद्ध, तृप्त आणि अविनाशी बनतो. लौकिक आणि वैदिक



कर्म करतांना भगवंताला अनुकूल शास्त्रोक्त कर्म करणे भगवंताला मान्य भक्ति करणे आहे ही भक्ती हे. असे मत प्रतिपादन ह.भ.प. अण्णाराव मुंढे यांनी केले. ते मुखेड येथे सुरू असलेल्या धरणी मातेच्या दिव्य मनोहरी दर्शन घडवणाऱ्या श्रावण मासानिमित्य धर्मनिरंतर साधुसंतांनच्या संनिध्यात चालू असलेल्या आकाराव्या अनुष्ठानात नव्या दिवशी बोलत होते. पुढे



बोलताना ह.भ.प. प्रा. अण्णाराव मुंढे महाराज म्हणाले की, लोकांतात भगवंताचा गुण श्रवण करणे, किर्तन करणे यातून भक्ती संपन्न होते. पुजेमध्ये मन लागणे, भगवंताच्या कथेमध्ये मन लागणे, आत्मकल्यानासाठी, स्वकल्याणासाठी मन लागणे, सर्वभावानी भगवंताला शरण जाणे, भगवंताचे थोडे ही विस्मरण झाले की व्याकुळ होणे ,कहीतरी हरवल्या सारखे वाटणे .

प्रेमरूपा भक्ती ही कर्म, ज्ञान आणि योग या पेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण कर्म अफलस्वरूप असतात, आवड गरजेसह सराव करावा लागतो. ज्ञान सहज साध्य होत नाही. विद्या आणि सुख एकाच वेळी प्राप्त होत नाही. विद्या ही कष्ट साध्य आहे. योग सहज साध्य नाहीत. अनुभवी गुरूच्या सानिध्यात नियमाने करावे लागतात. चुकीच्या पद्धतीने केल्यास विपरीत फलस्वरुप असतात. परंतु भक्ती भितीपोटी मनात नसतानाही केली तरी फलस्वरूप आहे. भक्तीमुळे स्वतःचे स्वरूप बदलते परमहितकारी संत बनता येते, तात्काळ धर्मात्मा बनता येते, तात्काळ तृप्ती शांती प्रदान करते. संसार बंधनातून मुक्ती प्राप्त करून देते. पंचज्ञानेद्र्य, पंचकर्मेद्र्य् यांच्या विषयाचा हळूहळू त्याग करणे, दुसंगाचा सर्वस्वी त्याग करणे, अखंड भगवंत भजनात राहणे, महानुभावाची सेवा करणे, एकांतात निवास करणे, लौकीक बंधनाला तोडून टाकणे, त्रिगुणविरहीत बनणे, योग आणि क्षेम याचा परित्याग करणे, कर्मफलाचा त्याग करून निर्द्वंन्द्वातीत स्थिर होणे. असे केल्याने स्वतः तरतो आणि इतरांनाही तारतो हेच प्रेमाच स्वरूप अनिर्वचनीय आहे.वरिल सर्व क्रिया गुणरहित कामणा रहित असुन प्रतिक्षण भक्ती वाढवणाऱ्या आहेत विच्छेद रहित सूक्ष्मातीत सूक्ष्म स्तराचा अनुभव करून देणाऱ्या आहेत मन बुद्धी स्मृती चेतना यांना चीटकणाऱ्या आहेत.भक्ती स्वतः प्रमाण स्वरूप आहे त्यामुळे तिला अन्य प्रमाणाची गरज नाही जोपर्यंत भक्तीमध्ये सिद्धी तृप्ती येत नाही तोपर्यंत भक्तांनी लोक व्यवहाराचा त्याग करू नये.निष्काम भावनेने भक्तीची साधना करत रहावी.लोक काय म्हणतील याची चिंता भक्तांनी करू नये. आपले लौकिक व वैदिक कर्म भगवंताला समर्पित करून जीवन जगावे असा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला व भगवंताच्या अंतरंग ऐश्वर्याचा अनुभव कसा घ्यावा याचे प्रात्यक्षिक त्यांनी करून घेतले एक महिनाभर चालणाऱ्या अनुष्ठानात अनेक भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत शेवटी आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत संस्कार भारती पब्लिक स्कूलचे घवघवीत यश

## सहा खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड



आधुनिक केसरी न्यूज

**वरोडा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत येथील संस्कार भारती पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि डावपेचांचा कस पाहणाऱ्या या स्पर्धेत संस्कार भारती पब्लिक स्कूलच्या सहा खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली. या कामगिरीच्या जोरावर श्रीहन राऊत, परिधी बोढे, सिद्धी मुथा, प्रज्वल मेश्राम, सम्यक मुथा आणि साहिल पवार यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, प्राचार्या, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले. जिल्हास्तरीय स्पर्धेतही अशीच दमदार कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करावे, यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# सतत बसणाऱ्या हादऱ्यांनी वरोडावासीयांमध्ये दहशतीचे वातावरण

## नागरिकांच्या नुकसानीचा पंचनामा करा अशी मागणी



आधुनिक केसरी न्यूज

**वरोडा :** शहराला दुपारच्या सुमारास हादरे बसत असून या हादऱ्यामुळे परिसरातील नागरिकांत चिंता व भीतीचे वातावरण पसरले असून त्यांच्या दहशत निर्माण झाली आहे. गेल्या चार दिवसापासून विशेषतः 23 ऑगस्ट रोजी बसलेला हादरा तर अत्यंत तीव्र स्वरूपाचा होता. या हादऱ्यामुळे घरातील भांडी पडल्याने काही लोक घाबरून धावत घराबाहेर आले होते.मात्र सतत दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास जाणवणारे हे हादरे कशामुळे बसत आहेत हे जाणून घेणे उत्सुकतेचे आहे. शहरातील स्नेहांकित नगर, ओमनगर,आंबेकर लेआउट अभ्यंकर वार्ड व शहराच्या इतर भागातही हे हादरे बसत आहेत. हे हादरे पांझुर्णी, आनंदवन व बोर्डा परिसरातही जाणवत आहेत हे विशेष. हे हादरे ठराविक वेळेतच बसत असून घराची दारे, खिडक्या यात कंपनी निर्माण होऊन आवाज येतो. शिवाय घरांना तडे जाणे, घरातील भांडी खाली पडणे यामुळे परिसरातील नागरिकांत दहशतीचे वातावरण पसरलेले आहे. शहरापासून अंदाजे पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या एकोणा कोळसा खाणीत होणाऱ्या स्फोटांमुळे हे हादरे बसत असावे असे काहींचे म्हणणे आहे. मात्र या हादऱ्यांमुळे नागरिकांची जीवहानी व वित्तहानी झाल्यास यास जबाबदार कोण? असा प्रश्न विचारला जात आहे. एकोणा कोळसा खाणीतील स्फोटामुळे हे हादरे बसत असल्यास नागरिकांच्या होणाऱ्या संभाव्य नुकसानीची वेकोली प्रशासन जबाबदारी स्वीकारेल काय? असा प्रश्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे. परिसरात सतत बसणारे हे हादरे कशामुळे जाणवत आहेत. याची चौकशी करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे.गेल्या काही दिवसापासून एकोणा कोळसा खाणीतील ब्लास्टिंगमुळे बसणाऱ्या या हा दर्या हादऱ्यां विरोधात नागरिकांनी आता कंबर कसली असून या संबंधात नागरिकांनी आमदार व खासदार यांचेकडे निवेदन सादर केले आहे. या हादऱ्यांमुळे नागरिकांच्या घरांच्या भिंतीला तडे पडत असून घराचे प्लास्टर तसेच खिडक्यांचे नुकसान होत असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. या संबंधात अभ्यंकर वार्डातील नागरिकांनी खासदार प्रतिभा धानोरकर यांना निवेदन दिले असून खाणीतील ब्लास्टिंग वर तातडीने नियंत्रण आणावे व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाची दखल न घेतल्यास जनआंदोलनाचा इशाराही नगरसेविका रोशनी भडके यांनी दिला आहे. खासदारांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात नगरसेविका रोशनी खडसे, फडके व नगरसेवक गजानन जीवतोडे, एडवोकेट गजानन बोढाले एडवोकेट ए.आर. जांभुळे, डॉक्टर आशिष पिसे, प्राध्यापक पिलगुलवार, अरविंद जीवतोडे, डॉक्टर प्रमोद गंपावार आदींचा समावेश होता. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते व माजी नगरसेवक छोटूभाई शेख यांनी शहराच्या काही भागात बसणाऱ्या या हादऱ्यांविरोधात आज आमदार करण देवतळे, उपविभागीय अधिकारी संदीप भस्के यांना निवेदन दिले असून निवेदनात खाणीतील मोठ्या प्रमाणात होणाऱ्या ब्लास्टिंगची तीव्रता कमी करावी. ब्लास्टिंग मुळे प्रभावित झालेल्या परिसराची पाहणी करण्यात यावी. ज्या नागरिकांच्या घरांचे नुकसान झाले आहे. त्यांचे पंचनामे करून त्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी. खाण व्यवस्थापक व व्यवस्थापनास याबाबत तातडीने निर्देश देऊन त्यांचे वर योग्य कायदेशीर कारवाई करण्यात यावी अश्या मागण्या करण्यात आल्या आहेत. शहराला बसणाऱ्या या हादऱ्यांविरोधात एक वर्षापूर्वी ओमनगर व आंबेकर लेआउट मधील नागरिकांनी मोहीम सुरू केली होती. त्यांनी लोकप्रतिनिधी व प्रशासनाला दिलेल्या निवेदनाची आमदारां व्यतिरिक्त अन्य कोणीही दखल घेतली नव्हती हे विशेष.

# ट्रकला आयशरची पाठीमागून जोरदार धडक; चालकाचा मृत्यू

## पैठण तालुक्यातील मुरमा येथील घटना





आधुनिक केसरी न्यूज

**पाचोड :** भंगार घेऊन जाणाऱ्या आयशरने समोरील ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने आयशर चालक गंभीर जखमी होऊन त्याचा उपचार दरम्यान मृत्यू झाल्याची दुर्घटना धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या मुरमा ता पैठण शिवारात सोमवारी दि ,24 माध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास घडली. दरम्यान अपघात घडतात आसपासच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी आयशर चालकाला बाहेर काढून रुग्णवाहकेद्वारे छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात दाखल केले मात्र गंभीर मार लागल्याने उपचारदरम्यान त्याचा मृत्यू झाला. असेफ महेमूद बेग वय (30) रा. बसवंतनगर लातूर असे मृत चालकाचे नाव आहे. या अपघाता विषयी अधिक अशी की, लातूर बसवंतनगर येथील रहिवासी असेफ बेग हा आपल्या मालकीच्या आयशर क्रमांक (MH38X2147 ) मध्ये भंगार भरून बीड येथून छत्रपती संभाजीनगरकडे घेऊन येत होता. दरम्यान धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाचोड जवळील असलेल्या मुरमा ता. पैठण शिवारात येताच आयशरच्या समोर चाललेल्या ट्रक क्रमांक (GJ03UV8253) च्या चालकाने पाठीमागील वाहनाचा अंदाज न घेता अचानक ट्रक एका धाब्यावर थांबण्यासाठी वळण घेतल्याने काही समजण्याच्या आतच पाठीमागील आयशर ट्रकला जोरदार पाठीमागून धडकली. ही धडक इतकी भीषण होती की आयशरचा समोरील भागाचा चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत चालक असेफ बेगच्या डोक्याला हातपायला जबर मारलगल्याने तो गंभीर जख्मी झाला. ही दीर्घटना घडताच मोठा आवाज झाला त्यामुळे जवळ आसपासच्या नागरिकांनी घटना स्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त आयशर चालकाला अडकून पडलेल्या कॅबिनच्या बाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे छत्रपती संभाजीनगर येथील घाटीत नेले असता यावेळी उपच्यादरम्यान त्याचा मध्यरात्री मृत्यू झाला. अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पाचोड ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक सुरळीत केली.तसेच ट्रक चालकाला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणून त्याच्याविरुद्ध निष्काळजीपणे ट्रक चालवून अपघात मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत असेफ बेग याच्या पश्चात आई-वडील पत्नी एक तीन वर्षाची मुलगी आणि दीड महिन्याचा लहान बाळ आहे.

**वडीला सोबत चहा घेतला असता तर :** मयत असेफचे वडील मेहमूद बेग यांनी बीडमध्ये मुलाला छत्रपती संभाजीनगरकडे निघण्या अगोदर हॉटेल मध्ये चहा घेऊन जाण्याचे सांगितले होते. परंतु असेफने उशीर होत आहे असे सांगून आयशर घेऊन निघाला. परंतु दीड तास उलटल्यानंतर लगेच वडिलांच्या कानी मुलाच्या आयशरचा अपघात झाल्याची वार्ता समजली. त्यांनी तातडीनी नातेवाईकांना सोबत घेऊन छत्रपती संभाजीनगर गाठलं आणि डोळ्यासमोर मुलाचा मृतदेह बघून एकच हंबरडा फोडला हे दृश्य बघून उपस्थितांचे डोळे पाणवले होते. जर असेफने वडीला सोबत हॉटेलात चहा घेतला असता तर कदाचित त्याचा जीव वाचला असता. अशी चर्चा नातेवाईक करत होते.

# ‘स्वयंसिद्धा बंध’ उपक्रमातून जवान आणि पोलिस बांधवांना प्रेमाची राखी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या शूर जवानांप्रती कृतज्ञता, सन्मान आणि आपुलकी व्यक्त करण्यासाठी एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या वतीने ‘स्वयंसिद्धा बंध’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०२१ पासून रक्षाबंधनाच्या निमित्ताने जवान आणि पोलिस बांधवांना विद्यार्थिनींनी तयार केलेल्या हस्तनिर्मित राख्या पाठविण्याची परंपरा जपली आहे. यंदाही विद्यापीठातर्फे सीमेवर तैनात असलेल्या जवानांसह गडचिरोली येथे कर्तव्य बजावणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी तब्बल ८ हजार राख्या पाठविण्यात येणार आहेत. ‘स्वयंसिद्धा बंध’ या उपक्रमांतर्गत आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या विद्यार्थिनींनी या राख्या





अत्यंत प्रेमाने व उत्साहाने स्वतः तयार केल्या आहेत. विद्यार्थिनींचा सहभाग अधिक प्रभावी व्हावा यासाठी विशेष राखी निर्मिती कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांनी या उपक्रमास शुभेच्छा देत प्रेरणादायी संदेश दिला. या उपक्रमासाठी आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे संचालक प्रा. प्रभाकर चव्हाण यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. विभागातील शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी 'स्वयंसिद्धा' समन्वयक प्रा. जास्वंदी वांबूरकर, डॉ. रेखा चव्हाण, डॉ. सोनाक्षी विचारे उपस्थित होत्या. विद्यार्थिनींनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या या राख्या केवळ प्रेमाचा धागा नसून, देशाच्या रक्षणासाठी निःस्वार्थपणे सेवा बजावणाऱ्या जवान आणि पोलिस बांधवांप्रती कृतज्ञता, आदर, स्नेह आणि भावनिक नाते व्यक्त करणारा बंध आहेत. ‘स्वयंसिद्ध बंध’च्या माध्यमातून विद्यार्थिनींनी राष्ट्रसेवेप्रती आपली संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी जपली आहे.